आदिवासी विकास विभाग, महाराष्ट्र शासन
**सहाय्यक जिल्हाधिकारी तथा प्रकल्प अधिकारी**
**एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कळवण, मौजे मानूर, कोल्हापूर फाटा, ता.कळवण, जि. नाशिक**
दूरध्वनी क्र. 02592-250101 Email Id :- poitdp.kalwan-mh@gov.in

**शासकीय आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना दूध (टेट्रापॅकमधील) पुरवठा मूळ ई-निविदा सूचना (ई-निविदा क्र. 6220)**

शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग, दि.15 जून 2017 अन्वये व शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, दि.1 डिसेंबर 2016 मधील तरतूदीन्वये सन 2018-19 या शैक्षणिक वर्षात माहे जानेवारी 2019 ते एप्रिल 2019 करीता प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कळवण, जि.नाशिक यांचे कार्यक्षेत्रातील 38 शासकीय आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना टेट्रापॅकमधील दूध पुरवठाकामी अधिकृत पुरवठाधारकांकडून ऑनलाईन निविदा मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | निविदा कामाचा तपशील | निविदा अर्ज शुल्क (नापरतावा) | बयाणा रक्कम (E.M.D.) रुपये | निविदेची अंदाजित एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|
| 1 | **नामांकीत कंपनीचे टेट्रापॅकमधील दूध** {3.0 ते 3.5% फॅट व 8.5% **एस.एन.एफ. प्रमाणानूसार होमोजिनाईज्ड व पाश्चराईज्ड दूध 1 लिटर परिमाणानूसार** (as per prevalent FSSA Standards)} **पुरवठा करणे.** (ई-निविदा क्र. 6220) | रु.12,000/- | रु.1,50,000/- | 2.00 कोटी रुपये |

**अटी व शर्ती :-**

1) संपूर्ण निविदा प्रक्रिया ही फक्त ऑनलाईन राहील. इच्छुक निविदाधारकांनी निविदा प्रक्रियेत भाग घेण्यासाठी ई-निविदा प्रणाली संदर्भातील **https://maharashtra.etenders.in** या Portal चे Sub-Portal **https://tribal.maharashtra.etenders.in** वर नोंदणी (enrollment) करणे अनिवार्य आहे. सदरबाबत शंका असल्यास **Sify Technologies Ltd. Nextender India Pvt. Ltd. (Pune) Contact No.020-23155555** या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क करावा.

2) निविदा सूचना, निविदेचे वेळापत्रक, विहीत अटी-शर्ती असा निविदेबाबत सविस्तर तपशील उपरोक्त नमूद वेबपोर्टलवर पाहावयास मिळेल. निविदा अर्ज विक्री (फॉर्म डाउनलोड) व निविदा तयार करणे (बिड प्रिपेरेशन) **दि.19.11.2018 ते दि.3.12.2018 रोजीपर्यंत** असून निविदा सादर करण्याचा (टेंडर सबमिशन) अंतिम **दि.5.12.2018 रोजीपर्यंत** आहे.

3) निविदेची बयाणा रक्कम व निविदा शुल्क निविदाधारक फर्म/ संस्था/ बचत गटाच्या नावे ऑनलाईन नेटबँकींग सुविधा असलेल्या बँक खात्यातून स्वखर्चाने ई-पेमेंट गेटवे मोड याद्वारे ई-पेमेंट करणे आवश्यक आहे अन्यथा सदरबाबत काही वाद निर्माण झाल्यास त्यास हे कार्यालय जबाबदार असणार नाही. बयाणा रक्कम व निविदा शुल्क सूट असल्याबाबत सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग संचालनालयाचे निविदेतील व्यवसायासंदर्भातील निविदाधारक फर्म/ संस्था/ बचत गटाच्या नावे नोदणी (MSME Registration) प्रमाणपत्र सादर करावे.

4) ईमेल, फॅक्स, स्पीडपोस्ट किंवा हस्तपोहोच इ. माध्यमांद्वारे तथा निविदा ऑनलाईन स्वीकृती दिनांकानंतर सादर केलेल्या निविदांचा तथा तांत्रिक लिफाफ्यातील कागदपत्रांचा विचार केला जाणार नाही. तसेच निविदा सादर करण्याच्या अंतिम दिनांकापर्यंत निविदा ऑनलाईन सादर न केल्यास (इंटरनेट कनेक्टीव्हिटी-जॅमिंग/ साईटक्रॅश, विद्युतपुरवठा खंड वा संगणक बिघाड इ. कारणांमुळे) सदरबाबत न्यायालयात दाद मागता येणार नाही.

5) ऑनलाईन निविदा नाकारणे अगर स्विकारणे, निविदा मंजूर करणे, त्यामधील अटी व शर्तीमध्ये वाढ करणे किंवा शिथील करणे, निविदा प्रक्रियेत बदल करणे, निविदा उघडण्याचा दिनांक पुढे ढकलणे अथवा संपूर्ण निविदा प्रक्रिया रद्द करणे याबाबतचे संपूर्ण अधिकार **प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कळवण, जि. नाशिक** यांनी राखून ठेवले आहेत.

**(शासनाचे ई-निविदा संकेतस्थळावर व सूचना फलकावर प्रसिध्दीकामी प्रत.)**
**दिनांक-** 17 /11/2018.

**पंकज आशिया, भा.प्र.से.**
**सहाय्यक जिल्हाधिकारी तथा**
**प्रकल्प अधिकारी**
**एकात्मिक आदिवासी विकास**
**प्रकल्प कळवण, जि. नाशिक**

Scanned by CamScanner